Impact Factor 5.604 p-ISSN 2454-7409 e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

## (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 7 ISSUE 1 January 2022
वर्ष सातवे, अंक पहिला, जानेवारी २०२२

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

### संपादक मंडळ Editorial Board

डॉ. ममता इंगोले, प्रा. रेखा वाठ, डॉ. गणपत उरकुंदे, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे, डॉ. कैलाश नेमाडे

1. **Dr. M.J. Ingole,** Address: H.N. Sinha Mahavidyalay, Patur, Dist. Akola 444 001 (India)
E mail: mamtaingole2812@gmail.com Mobile No.: +91-9823392953
2. **Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: +91-9422153353
3. **Dr. G.P. Urkunde,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: urkundeganpat@gmail.com Mobile No.: +91-9765034097
4. **Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: +91-9923909296
5. **Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: +91-9420199479
6. **Dr. K.R. Nemade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: krnemade@gmail.com Mobile No.: +91-7020242364

Shivaji College of Art's Hingoli



**Invited Editors**

1. **Vikram Raje**, 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
2. **Vishal Dahalkar**, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
3. **Dr. Anita Gupte Patil**, Auckland, New Zealand
4. **Ranjit Raje**, 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

1. **Mrs. Sonali Dahalkar**, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
2. **Dr. J. Prabhash**, Former Pro-VC, Uni. of Kerala, Thiruvananthpuram, Director General of State institute of parliamentary affairs, Visiting fellow of diff. Uni. Australia, USA
3. **Dr. Ramesh Mangal**, NAAC Assessor, Ex. Principal, MKHS Guj. College & Director SVCC, Indore, M.P.
4. **Dr. Anil Gajbhiye**, Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
5. **Dr. Shashikant Sawant**, Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.
6. **Prof. Dineshkumar Joshi**, Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
7. **Dr. P.W. Kale**, Ex. Dean, Faculty of Commerce, S.G.B. Amravati University, Amravati
8. **Dr. R.A. Mishra**, Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
9. **Dr. U.V. Navalekar**, Principal, Abasaheb Parvekar Mahvidyalaya, Yavatmal
10. **Dr. J.M. Chatur**, Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal
11. **Dr. Dhanaji Gurav**, Principal, Dr.Babasaheb Ambedkar College, Mahad, Dist. Raigarh,
12. **Dr. Leela More**, Ex-Professor, Government College, Indore, M.P.
13. **Dr. Sindhu Mandavkar**, Ex-Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra

**मुद्रक** : सेवा प्रकाशन, विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ व संगणक** : डॉ. पवन मांडवकर

## Communication

Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
E mail: marathipradhyapak@gmail.com
Alternate mail id: researchjournalofindia@gmail.com
Telephone: +91-7201-226147, 226129 Mobil No.: +91-9422867658, +91-9403014885
**Website:** 1) www.researchjournal.net.in 2) www.indiramahavidyalaya.com

**Online Access Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 500/-** by crossed Cheque or by DD or by RTGS/IMPS A/c in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank Of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047, MICR - 445014001

(सूचना : या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. संदर्भ वापरताना या नियतकालिकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

...li College of Art's ...ngoli

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | मसाहतिक काळातील ख्रिस्ती साहित्याचे योगदान | डॉ. अतुल नारायन चौरे | ५–७ |
| २ | मुस्लीम धर्मातील भटके विमुक्त | सौ. विजयालक्ष्मी देवगोजी<br>मार्गदर्शक: डॉ. मनीषा नेसरकर | ८–१३ |
| ३ | लिखित भाषेचा कट्टा | डॉ. अनंता मच्छिंद्र कस्तुरे | १४–१७ |
| ४ | नीग्रो आणि दलित वाङ्मय: एक तौलनिक विचार | प्रा. डॉ. विजयकुमार खंदारे | १८–२२ |
| ५ | हिंदू–मुस्लिम संघर्षाचे विदारक चित्रण : इंधन | प्रा.डॉ. नरसिंग कदम | २३–२५ |
| ६ | चर्मकार स्त्री – काल आणि आज | प्रा. डॉ. विठ्ठल नामदेव रोटे | २६–२९ |
| ७ | 'हेळसांड' कादंबरीतील सहकाराचे चित्रण | प्रा. अरुण बळीराम पडघन | ३०–३३ |
| ८ | आदिवासी कवयित्री : एक आकलन | डॉ. मीनाक्षी बऱ्हाटे | ३४–३८ |
| ९ | समकालीन मराठी कथेचे स्वरूप | डॉ. प्रवीण घारपुरे | ३९–४३ |
| १० | तुकारामांच्या अभंगातील तत्त्वज्ञान | प्रा. डॉ. मिलिंद कांबळे | ४४–४७ |
| ११ | महिलांवर अत्याचार करणाऱ्यांचे धाडस की मानसिक विकृती ! | प्रा. कोने दिलीप महादू | ४८–५२ |
| १२ | नारानदेवाचे विधीनाट्य | जोत्स्ना सखाराम राव | ५३–५९ |
| १३ | आंबेडकरी चळवळीचा खंदा पुरस्कर्ता वामनदादा कर्डक | प्रा. डॉ. संगीता मुंढे | ६०–६४ |
| १४ | संगणक आणि मराठी भाषा | प्रा. डॉ. शिवाजी पाटील | ६५–६८ |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन शिक्षणविषयक विचार | प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर | ६९–७२ |
| १६ | संत तुकाराम महाराज यांचे समतेच्या लढ्यातील योगदान | प्रा. बबन बळीराम अवघडे | ७३–७५ |
| १७ | महाराष्ट्राची सांस्कृतिक मराठी रंगभूमी : एक आढावा | डॉ. विनोद उत्तमराव भालेराव | ७६–८० |

Shivaji College of Arts Hingoli



# आंबेडकरी चळवळीचा खंदा पुरस्कर्ता वामनदादा कर्डक

प्रा.डॉ. संगीता मुंढे
मराठी विभाग
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
ई-मेल sangitamundhe1@gmail.com मो.नं. ८८८८०६१३६५

## सारांश-

वामनदादा कर्डक यांना लोकशाहीर म्हणून ओळखले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान सामान्य माणसापर्यंत नेऊन पोहोचवणे हेच त्यांचे जीवन ध्येय होते. त्यांच्या विचारांच्या प्रचारासाठी वामन दादांनी दहा हजाराच्या वर गीतं लिहिली. त्यांचीही गीतं खूप लोकप्रिय झाली आहेत. वामनदादांच्या गीतामुळे डॉ. बाबासाहेबांचे काम सोपे झाले असे म्हणावे लागेल. आंबेडकरी चळवळ अधिक लोकाभिमुख करण्याचे काम वामनदादांच्या गीताने केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय सामाजिक धार्मिक शैक्षणिक कार्याचे प्रतिबिंब आपल्याला त्यांच्या गीतातून उमटलेले दिसते,म्हणून बाबासाहेबांच्या विचारांचा खंदा पुरस्कर्ता म्हणून वामनदादा कर्डक यांना ओळखले जाते.

## प्रस्तावना-

ज्यांचा उल्लेख लोककवी, लोकशाहीर म्हणून केला जातो असे वामनदादा कर्डक.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महाराष्ट्राच्या घराघरात,खेडोपाड्यात, वाडी - तांड्यात पोहोचवण्याचे काम वामनदादांनीकेले. विचाराचा प्रचार आणि प्रसार जर मोठ्या प्रमाणावर झाला, तरच त्या विचारांना लोक चळवळीचे सामर्थ्य प्राप्त होत असते.डॉ. बाबासाहेबांचे विचार साध्या सोप्या भाषेत आणि गीताच्या माध्यमातून घराघरात पोचवण्याचे काम वामनदादांनी केलं. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं काम काही प्रमाणात तरी सोपं झालं असं म्हणावे लागेल. स्वतः बाबासाहेब म्हणत की, दादा माझी दहाभाषणं आणि तुमचं एक गीत बरोबर आहे. यातून त्यांच्या गीताचं मोल लक्षात येतं. वामनदादानी दहा हजाराच्या वर गीतं लिहिली. त्यांच्या गीताला लोकगीताचे मोल प्राप्त झालेआहे. यातून समाज जीवनातील त्यांच्या गीताचं मोल लक्षात येतं.

### बीज शब्द-

लोकशाहीर, लोकगीत, गीत, विडंबन तत्त्वज्ञान.

## विषय विवेचन-

वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ऑगस्ट १९२२साली नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुक्यातील देशवंडी या छोट्याशा खेड्यात झाला. वडिलांचे नाव तबाजी व आईचे नाव सईबाई होते. त्यांना एक भाऊ व एक बहीण होती. घरी शेती असली तरी परिस्थितीही बेताचीच होती. पोट भरण्यासाठी घरातील सर्वांनाच मिळेल ते काम करावे लागे. वामनदादांनी लहानपणी गुरे चारण्या पासून ते गिरणी कामगार म्हणून पडेल ती कामे केली. खऱ्या अर्थाने आयुष्याच्या या व्यवहारी जगातच त्यांचं शिक्षण झालं. पुस्तकी शाळा ते

Shivaji College of Arts ... Hingoli

शिकलेले नव्हते, वयाच्या १९-२० व्या वर्षी त्यांचे लग्न झाले. त्यांना एक मुलगी होती मीरा नावाची. त्यांचे वैवाहिक आयुष्य सुखाचे गेले नाही. त्यांची पत्नी त्यांना सोडून गेली. मुलीचाही नंतर मृत्यू झाला, नंतर ते आपल्या आईसोबत पोटापाण्यासाठी मुंबईला आले,तेथे त्यांनी पडेल ती कामे केली. शिवडीच्या बीडीडी चाळीत रहात असताना ते 'समता सैनिक दलात' सामील झाले. मुंबईला येईपर्यंत वामनदादांचा, अक्षरांशी परिचय नव्हता. एकदा चाळींमधील एका माणसाने त्यांना पत्र वाचायला सांगितले तेव्हा त्यांना पत्र वाचता येईना.या गोष्टीचे त्यांना खूप वाईट वाटले, इथून पुढे त्यांनी शिकायचे ठरवले. एका शिक्षकाकडून त्यांनी लिहा वाचायला शिकले आणि नंतर त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. मिळेल ती पुस्तके त्यांनी वाचून काढली. त्या काळात आंबेडकरी चळवळीचे वारे सर्वत्र वाहत होते. वामनदादा समता सैनिक दलातील मुलांबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभेला जात असत. त्यांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव वामनदादांच्यावर पडला आहे. वामनदादांचा आवाज गोड होता. ते स्वतः गाणी रचून ती गात. त्यांना अभिनयाची आवड होती. त्यांना चित्रपट कलाकार व्हायचे होते. त्या काळातील काही गाजलेल्या गीताचे त्यांनी विडंबनही केले होते. ते लोकांना खूप आवडले. इथून पुढे त्यांना गीते रचण्याचा नादच लागला. त्यांनी लिहिलेली अनेक चित्रपट गीते खूप गाजली.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेच्या आधी त्यांच्या गीत गायनाचा कार्यक्रम होई, त्याला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असे.'वाटचाल','मोहोळ','हे गीत वामनाचे' हे त्यांचे गीतसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक चित्रपटासाठी गीते लिहिली. त्यांच्या गाण्याच्या ध्वनीचित्रफितीही उपलब्ध आहेत. त्यांचे "सांगा या वेडीला माझ्या गुलछडीला" किंवा "चलग हरणे तुरुतुरु चिमण्या उडती भुरुभुरु" ही लोकप्रिय अशी चित्रपट गीते आहेत. एक गीतकार म्हणून त्यांना खूप लोकप्रियता मिळाली असती पण दादासाहेब गायकवाड यांनी त्यांना सांगितले की, चित्रपट सृष्टीला तुमची गरज नाही तर, सामान्य माणसाला तुमची गरज आहे. तेव्हा वामनदादांनी चित्रपट सृष्टी सोडली व सामान्य माणसा, माणसांपर्यंत बाबासाहेबांचा विचार नेहून पोहोचवला. वामनदादांच्या या कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि मानसन्मानही मिळाले आहेत. त्यात महत्त्वाचे पुरस्कार म्हणजे, दिल्लीची डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप, महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, महाराष्ट्र शासनाच्या रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे तीन वर्ष सदस्यत्व, महाराष्ट्र साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाचे सदस्यत्व इत्यादी अनेक मानाचे पुरस्कार आणि मान-सन्मान त्यांना मिळाले. त्यांच्यावर औरंगाबाद येथील संस्थेने वामनदादा कर्डक साहित्य संमेलन१५मे२००८ रोजी भरविले या संमेलनाचे अध्यक्ष यशवंत मनोहर हे होते. वामनदादांना बाबासाहेबांचा सहवास लाभला होता. त्यांच्या अनेकदा भेटी झाल्या होत्या.डॉ. बाबासाहेबांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवणे हेच त्यांचे जीवितकार्य बनले होते.ते म्हणत,

"भीम वाणी पडली माझ्या कानी  
तीच वाणी ठरली माझी गाणी"१

यातून त्यांच्या गीताच्या पाठीमागील प्रेरणा समजते.डॉ. यशवंत मनोहर वामनदादांच्या गीतापाठीमागील प्रेरणा सांगताना म्हणतात,"वामनदादा हे प्रतिभावंत गीतकार आहेत. ते आंबेडकरवादी गीतकार म्हणून प्रख्यात आहेत. या आंबेडकरी जाणिवेच्या गीतामागील निर्मिती कारण आंबेडकर यांनी केलेले क्रांतिकार्य आणि या क्रांती कार्यामागे उभे असलेले तत्त्वज्ञान हेच आहे. कोणत्याही प्रतिभावंताच्या लेखनामागे एक प्रेरणा उभी असते तशी वामनदादांच्या गीतामागेही ती उभी आहे."२ ही प्रेरणाच वामनदादांची जीवननिष्ठा बनली आहे. संपूर्ण आयुष्य त्यांनी त्यासाठी घालविले. त्यांना एक गीतकार किंवा चित्रपट कलाकार म्हणून लोकप्रियतामिळाली असती; पण त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार करण्यात घालविले.वामनदादांची गीतं म्हणजेडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय, सामाजिक,

...ivaji College of Arts ... ingoli



धार्मिक, शैक्षणिक कार्याचे प्रतिबिंब आहे. आंबेडकरी चळवळीचा संपूर्ण पट आपल्याला त्यांच्या गीतातून उलगडताना दिसतो.

वामनदादांच्या गीताची एक विशिष्ट शैली होती. लोकगीत सदृश्य रचना त्यांनी केल्या. त्यामुळे त्या लोकांच्या मनात कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचवणे हेच त्यांच्या गिताचे प्रयोजन असल्यामुळे त्यात बोधपरता आणि उद्‌बोधन आलेले दिसते. ही गीतं सामान्य माणसांची कधी बनली ते कळले देखील नाही. या गीतात गेयता असल्यामुळे ती पाठांतर सुलभ आहेत. त्यांची गीतं ही अत्यंत साधी सोपी आहेत, त्यामुळे सामान्यातल्या सामान्य माणसाला ती समजतात व आपलीशी वाटतात. या गीताची भाषा ही साधी, सोपी आहे. लोकांची दररोजची बोलीभाषा हीच त्यांच्या गीताची भाषा आहे. विविधता हे वामनदादांच्या गिताचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्वच विषयावर त्यांनी गीतरचना केली आहे. प्रामुख्याने आंबेडकरी तत्त्वज्ञान साध्या सोप्या भाषेतून सांगणे हेच त्यांच्या गिताचे ध्येय होते. डॉ. बाबासाहेबांच्या नंतर त्यांचे तत्वज्ञान जिवंत ठेवण्याचे काम वामनदादांच्यागीतांनी केले.डॉ. बाबासाहेबानंतर दलित चळवळी मध्ये दुही निर्माण झालीया गोष्टीचा वामनदादांना खूप त्रास झाला.दलितहा एकसंघ राहिला पाहिजे त्याशिवाय त्यांची प्रगती शक्यनाही, हे वामनदादांना माहिती होते म्हणून त्यांनी दलितांच्या एकीसाठी मोठ्या प्रमाणावर जनजागरण गीताच्या माध्यमातून केले. ते म्हणत,

"जपून वागा बाई गं बाई<br>
ती भिमाई आता नाही .....<br>
लावुन सुखाला स्वतःचआपुल्या काळे<br>
थैमान घालती पहा आईची बाळे<br>
काल आई असता कोणी न केले चाळे<br>
तेच विणु लागले आज विषारी जाळे<br>
असे हे आपुले भाई ग बाई...."३

यातून डॉ. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर त्यांच्याच विचारातुन तयार झालेले कार्यकर्ते कसे आपसात भांडू लागले हे समजते. ते दुःख वामनदादांनी व्यक्त केले आहे. उघडपणे पुन्हा दलितांवर अन्याय अत्याचार घडतात आणि दलित मात्र दुफळीतअडकून पडलेला त्यांना दिसतो.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार विसरुन फक्त स्वतःपुरता विचार करणारे कार्यकर्ते पाहून ते दुःखी होतात.खूप मोठ्या कष्टानंतर दलितांना स्वतःचे अधिकार मिळाले होते.आता तर कुठे सुखाचे दिवस दिसत होते, मात्र कार्यकर्त्यांच्या स्वार्थामुळे ही चळवळ वेगळ्याच वाटेकडेनिघालेली दिसते.हे पाहून वामन दादांना खूप दुःख होते ते म्हणतात,

"मला चिड येत नाही. हाच माझा गुन्हा<br>
दोष देऊ कुणा, सांगा दोष देऊ कुणा<br>
आहे तेच माझे गाव आणि तेच गांवकर<br>
माझा भिम असताना कापायचे थरथर<br>
गेला गेला भीमराणा, आला नेभळटपणा<br>
क्रूर कठोर काळाशी जरी गाठ होती माझी<br>
भीम माझ्या मधीहोता, मान ताठ होती माझी<br>
आज माझ्यातला भीम इथे मीच केला उणा."४

बाबासाहेबांनी दलितांमध्ये जो आत्मविश्वास, स्वाभिमान निर्माण केला होता, तो त्यांच्यानंतर उणावतांनावामनदादांना दिसतो, म्हणून ते म्हणतात की,'माझ्यातला भीम इथं मीच केलाउणा' म्हणजे आपले शत्रू दुसरे कोणी नाही तर आपणच आहोत. बाहेरील शत्रूसोबत एक वेळ लढणं सोपं असतं; पण



117

College Arts Hingoli

...ला आपलेच भाईबंद आपले शत्रू असतात तेव्हा मात्र ही लढाई अवघड होऊन बसते. म्हणून वामनदादा बहुजन समाजाला पुन्हापुन्हा सांगतात,

"भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीच्या तयांच्या न्यारेच टोक असते."५

म्हणजे चांगल्या विचारांचे लोक कमी असले तरी चालतील; पण ते एक असलेपाहिजे. म्हणून भीम विचारांची आवश्यक्ता ते पुन्हा पुन्हा मांडतात ते सांगतात.

तुडवाया टपलेतुला,
वैरानरानच्या फुला
ही जानअसुदेतुला
रे भीमरायाच्या मुला."६

आपण जर एक असत नाही तर, शत्रूला आपल्याला संपवनं किती सोपंआहे, हे वामनदादा अनेक गीतातून सांगतात. बाबासाहेबांनी जो लढा देऊन आपल्याला सन्मानाचंजगणं मिळवूनदिलं, ते असं फुकापदरी घालवूनका. हेच जीव तोडून वामनदादा पुन्हापुन्हा दलितांना सांगतात गीताच्या माध्यमातून.

वाळूनी चालला हा उभा जोंधळा
कोण राखील आता भिमाचा मळा
शेत सोडून जाता धनी मावळा
सोनियाच्या स्थळी पातली अवकळा."७

वामनदादाच्या मनातील दुःख व्यक्त करताना प्राध्यापक गंगाधर पानतावणे म्हणतात," भिमरावाच्या समृद्ध मळ्याला आलेली अवकळा पाहून कवी विषण्ण होतो. पोटच्या लेकरागत ज्याला राखला,करुणेचीझारी घेऊन जिथे एकेका रोपावर जलसिंचन केले,तोमळा आता दुहीने पेटलेला आहे.एकीचा जोंधळा आता वाळून चालला आहे. कवीने व्यक्त केलेल्या ह्या भावना संवेद्य आहेत.भीमापाठी अन्यायाने पुनः उसळी मारली आहे.लेकीबहिणींची अब्रू बेदरकारपणे लुटली जात आहे. घरे जाळली जात आहेत.निर्घृणछळचाललेला आहे. पण सारेच मूग गिळून बसत आहेत.चीडच नष्ट झाली आहे."८यातून वामनदादा च्या मनातील वेदना व्यक्त होते.आंबेडकरी चळवळीच्या माध्यमातून आंबेडकरांचे विचार तत्त्वज्ञान सामान्य माणसा माणसांपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. माणसाचे हित हेच त्यांचं प्रमुख उद्दिष्ट होतं. त्यासाठीच ते अविरतपणे कार्यरत होते. वामन दादा म्हणतात,

"माणसा इथे मी तुझे गीत व्हावे
असे गीत गावे तुझे हित व्हावे."९

यातून त्यांच्या गीताच्या पाठीमागची भूमिका व्यक्त होते.सामान्य माणसाचं जगणं सुखद व्हावं, त्याच्या जीवनात परिवर्तन घडून यावे,त्याचं दुःख हलकं व्हावं म्हणून वामनदादा शेवटपर्यंत झगडत राहिले.सामान्य माणसाचं हित कशात आहे ते त्याला सांगत राहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे अनुकरण केलं तरच सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडून येईल यावर त्यांचा ठाम विश्वास होता, म्हणून त्यांनीअखंडपणे आयुष्याच्या शेवटपर्यंत भीम लोकांपर्यंत पोहोचवला. ते म्हणतअसत,

"जोवरी जिने आहे तोवरी चालणे आहे
भीम वाटेवरी विसावा घेणे आहे."१०

यातून आपल्याला वामनदादा कर्डक यांच्या संपूर्ण आयुष्यावर प्रकाश पडतो. आंबेडकरी चळवळीचा एक खंदा पुरस्कर्ता म्हणून वामनदादांना ओळखले जाते. अतिशय तळमळीने आंबेडकरी चळवळ टिकावी,वाढावी, त्यातून सामान्य माणसाचं हीतव्हावं हीच त्यांच्याजगण्याची आणि गीताची मूळ प्रेरणा होती.



118

...ji College of Arts ... Hingoli



## निष्कर्ष-

१) आंबेडकरांचे विचार घराघरात पोहोचवण्याचं काम वामन दादा कर्डक यांनी केले.

२) वामनदादांच्या गीतापाठीमागची प्रेरणामाणसाचं हीतव्हावंहीच होती.

३) आंबेडकरांचे विचार हाच त्यांच्या जगण्याचा श्वास होता.

## संदर्भ:

१) कर्डक वामनदादा– मोहळ, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.पाचवीआवृत्ती २००८पृ.१०

२) डॉ. मनोहर यशवंत- आंबेडकरवादी महागीतकार वामनदादा कर्डक,युगसाक्षी प्रकाशन,नागपूर.प्र.आ.२००५पृ.१३

३) कर्डक वामनदादा– मोहळ, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.पाचवी आवृत्ती. २००८पृ.८१

४) उ.नि. पृ.३३

५) उ.नि.पृ.४८

६) उ.नि.पृ.६८

७) उ.नि.पृ.२०

८) फडके भालचंद्र- दलित साहित्य वेदना व विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन,पुणे. तिसरी आवृत्ती.२०००पृ.११६

९) कर्डक वामनदादा –मोहळ, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.पाचवी आवृत्ती २००८

१०) उ.नि.

❖❖❖

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)